26-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 25-05-2025 22:34 Page 1



# आधुनिक विकासाबरोबरच संस्कृती जपा

## मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत | मये महोत्सवाचा समारोप उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २५ :** चौफेर विकासाची गरुड झेप घेत असतानाच विकासाबरोबरच आपल्या परंपरा आपली संस्कृती आपले गाव पण तितक्याच आत्मीयतेने जपणे गरजेचे आहे. शेकडो वर्षाची परंपरा असलेली आपली संस्कृती नव्या पिढीने जपावी यासाठी ग्रामीण भागातून मये महोत्सवा सारखे महोत्सव हे उत्तम माध्यम आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी मये येथे केले.

आज रोजगार कंत्राटदार व इतर क्षेत्रात परप्रांतीयांचा भरणा दिसत आहे. या प्रत्येक क्षेत्रात माझा गोमंतकीय युवक पुढे यावा हा आपला ध्यास आहे.आणि त्याच भावनांनी स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर गोव्यासाठी कौशल्य, उत्पादन, सेवा या सर्व क्षेत्रात तरुणांनी भरारी घ्यावी यासाठी गावातील सामाजिक संस्था शैक्षणिक संस्था शिक्षक ज्येष्ठ नागरिक यांनी पुढाकार घ्यावा अशा प्रकारचे आवाहन मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी केले.

रायझिंग युथ मये कला आणि संस्कृती खाते, विजयानंद ज्ञान प्रसारक संस्था व महामाया हायस्कूल माजी विद्यार्थी संघटना यांच्यातर्फे आयोजित दोन दिवसीय तिसऱ्या मये महोत्सव समारोप सोहळ्यास मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते

व्यासपीठावर गोवा कोकणी अकादमीचे अध्यक्ष डॉ. पूर्णानंद च्यारी, स्वागत अध्यक्ष दयानंद कारबोटकर, माजी आमदार धर्मा चोडणकर डॉक्टर स्नेहा भागवत आयोजन समितीचे अध्यक्ष रुपेश ठाणेकर, कमलाकांत तारी,विविध पंचायतीचे सरपंच पंचायत सदस्य उपस्थित होते. आपली लोकगीते लोककला धालो गीत या जुन्या परंपरां, गीत आहेत त्या गीतांचे संवर्धन करण्यासाठी नव्या पिढीने विशेष योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.



मये : महोत्सवात मान्यवरांचा सत्कार करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत डॉ पूर्णानंद च्यारी, रुपेश ठाणेकर, दया कारबोटकर, डॉ. स्नेहा भागवत, कमलाकांत तारी, धर्मा चोडणकर व इतर

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन लाभण्याची गरज आहे, काही शिक्षक विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवत नसल्याने त्यांचे भवितव्य रखडते व चुकीच्या मार्गाने गेल्याने त्याचा जीवनावरही परिणाम होतो. शिक्षकांनी याचे भान ठेवून योग्य मार्गदर्शन करावे असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

रुपेश ठाणेकर या युवकांनी मये भागात शैक्षणिक क्रांतीला चालना दिली तसेच तरुणांना बरोबर घेऊन सामाजिक क्षेत्रात त्यांचे कार्य चांगल्या प्रकारे चालू असून तरुणांनी गोव्याची दिशा ठरवावी त्यासाठी आत्मनिर्भर होत असताना केवळ नोकरी मागे न लागता रोजगार निर्माण करणारा युवक व्हावा अशा प्रकारची इच्छा ही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली . यावेळी सत्कारमूर्तींचे त्यांनी अभिनंदन केले

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते हभप शिवलीला ताई पाटील कीर्तनकार, तसेच शुभदा गावकर सिताराम सावंत, कमलावती चोडणकर यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला

यावेळी डॉ. पूर्णानंद च्यारी यांनी संस्कृती जपण्याच काम तसेच पूरातन वारसा जपण्याचे कार्य अश्या उत्सवातुन होत असल्याचे सांगितले. धर्मा चो डण क र, डॉ स्नेहा भागवत, दया कारबोटकर यांनी विचार मांडले. स्वागत रुपेश ठाणेकर यांनी करताना उत्सवास मुख्यमंत्री थेट दिल्लीतून मयेत येवून युवा शक्तीला प्रेरणा दिली त्याबद्दल विशेष अभिनंदन केले. या वेळी शिवलीला ताई पाटील यांचे वैशिष्ट्या पूर्ण कीर्तन रंगले.या वेळी सांस्कृतिक कार्यकमाला मोठा प्रतिसाद लभला. उदय पत्रे यांनी आभार मानले.

## पान १ वरून

### मडगावमध्ये असुरक्षित इमारतींचा धोका गंभीर

उद्या जर एखादा ग्राहक किंवा वाटसरू जखमी झाला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार ? याकडे दुर्लक्ष करणं म्हणजे निष्काळजीपणाच नव्हे तर जनतेच्या जिवाशी खेळ करणं आहे, असं ते म्हणाले. पावसाळा सुरू झालेला असताना, अशा असुरक्षित इमारती कोसळण्याचा धोका आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने तात्काळ निर्णय घेऊन संबंधित इमारतींचे पाडकाम सुरू करावे, अशी नागरिकांची जोरदार मागणी आहे.

### भारत चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था

चला प्रत्यक्ष परिस्थितीबद्दल बोलूया . दरडोई उत्पन्न, श्रीमंत–गरीब यांच्यातील वाढती दरी, बेरोजगारी आणि ईएमआयच्या ओझ्याखाली दबलेला मध्यमवर्ग यांच्याबाबत चर्चा करूया. ते पुढे म्हणाले, एमएसएमई क्षेत्राची स्थिती, ४५ वर्षांतील उच्चतम बेरोजगारी दर आणि सामान्य नागरिकांच्या आर्थिक अडचणी यावरही बोलले पाहिजे. केवळ इतर देशांशी तुलना करून समाधान मानणे योग्य नाही, तर देशातील नागरिक खऱ्या अर्थाने कुठे आहेत हे पाहणं महत्त्वाचं आहे.

# पेडणे भंडारी समाजाच्या अध्यक्षपदी रोहिदास भाटलेकर



■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २५ :** गोव्यात मोठ्या संख्येने असलेल्या भंडारी समाजावर सर्व राजकीय पक्षाने आतापर्यंत अन्याय केला. रवी नाईक वगळता गोवा मुक्ती नंतर भंडारी समाजाचा मुख्यमंत्री झाला नाही. रवी नाईक च्या रुपाने पहिला भंडारी समाजाचा मुख्यमंत्री मिळाला त्यानंतर या समाजाचा परत मुख्यमंत्री झाला नाही. मात्र या समाजाच्या मतावर सर्वांनी आपली पोळी भाजून घेतली. यापुढे भंडारी समाज आपली शक्ती विधानसभा निवडणुकीत दाखवणार आहे. यासाठी जनगणना समाज बांधवांची महत्त्वाची असून त्या दृष्टीने आता काम हाती घेण्यात येणार आहे. सर्व भंडारी बांधवांनी आपले आपसातील मतभेद विसरून भंडारी समाजासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन यावेळी संजू नाईक यांनी केले.

४० मतदारसंघात २६ ते ३० मतदारसंघ आम्ही जोडून ठेवले आहेत. प्रत्येक तालुक्यातील भंडारी समाज जनजागृती करणार असून त्याप्रमाणे आगामी विधानसभा निवडणुकीत भंडारी समाजाचे आमदार मोठ्या प्रमाणात निवडून आणणार असल्याचे गोमंतक भंडारी केंद्रीय समाजाचे अध्यक्ष उपेंद्र गावकर यांनी सांगितले.

पेडणे श्री भगवती हायस्कूलच्या सभागृहात झालेल्या या बैठकीला व्यासपीठावर समाजाचे नेते नेता केंद्रीय समितीचे पदाधिकारी उपेंद्र गावकर, प्रवक्ते संजीव नाईक, हनुमंत नाईक, उमेश नाईक, अर्मल जिल्हा पंचायत सदस्य रंगनाथ कलशावकर ,प्रभाकर मांद्रेकर, नगराध्यक्ष मनोज हरमलकर, म्हापसा नगरपालिकेचे नगरसेवक तारक आरोलकर , संदिप वेर्णेकर, मधु कानोळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पेडणे तालुका भंडारी समाजाची समिती निवडण्यात आली. तालुका भंडारी समाजाच्या अध्यक्षपदी रोहिदास भाटलेकर यांची केंद्रीय समितीच्या उपस्थितीत निवड झाली. यावेळी निवडण्यात आलेले समितीचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत. उपाध्यक्ष चिंतामणी पोळजी, उदय मांद्रेकर, नानू मोरजकर, प्रदीप कांबळी, सरचिटणीस रुद्रेश नागवेकर सेक्रेटरी नितीन नर्से, खजिनदार गजानन गडेकर, सहखजिनदार विलास गडेकर. सदस्य प्रशांत गडेकर, प्रदीप आरोलकर, नारायण तळकटकर, किरण हळदणकर, रघुनाथ मांद्रेकर, दीपक मांद्रेकर, रुद्राक्ष मुरारी, बाळू राऊळ, संतोष पेडणेकर, विश्वास नारोजी, दिवाकर आरोलकर , कांता आसोलकर, उमेश हळदणकर, गुंडू राऊळ, कृष्णा भाईडकर , रोहिदास हरमलकर, रूपेश कुम्रलकर, नानू पालयेकर, भालचंद्र भगत,

सल्लागर समिती– सुशांत मांद्रेकर, महादेव गवंडी, प्रदीप आरोलकर, विनोद मेथर. केंद्रीय सल्लागार समिती सदस्य रंगनाथ कलशावकर (जि. पं. सदस्य). पेडणे युवा समिती अध्यक्ष मनोज हरमलकर (नगराध्यक्ष), पेडणे तालुका महिला अध्यक्ष प्रतीक्षा आरोलकर यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार उमेश तळवणेकर आणि आभार यांनी मानले.

# डॉ. विनायक मोरे यांना राष्ट्रीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार



■ टीम दैनिक हेराल्ड

**गुळेली, दि. २५ :** गोवा विद्याप्रसारक मंडळाच्या डॉ. दादा वैद्य शिक्षण महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. विनायक सोपान मोरे यांना शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या दीर्घकालीन आणि उल्लेखनीय कार्यासाठी राष्ट्रीय उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार – २०२५' देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार वितरण समारंभाला डॉ.लिकायत खान (मुंबई विद्यापीठ) डॉ.एस.टी.पाटिल उपाध्यक्ष एस. एस. व्ही .पी. एस. धुळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

रिअल इंडो ग्लोबल व्हिजन सोशल डेव्हलपमेंट गुरुकुल फाउंडेशन, धुळे (महाराष्ट्र) यांच्या वतीने १८ मे २०२५ रोजी एस.एस.व्ही.पी.एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धुळे येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संपूर्ण भारतातून निवडलेल्या मान्यवर शिक्षकांमध्ये डॉ. मोरे यांचा समावेश होत असून, त्यांनी शिक्षणक्षेत्रात केलेल्या नावीन्यपूर्ण प्रयत्नांची आणि विद्यार्थिप्रिय भूमिकेची या पुरस्काराद्वारे दखल घेण्यात आली आहे.

डॉ. मोरे यांनी वेदिक मॅथेमॅटिक्स फॉर कॉम्पिटिटिव्ह एक्झॅम्स' या मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचे यशस्वी आयोजन व मार्गदर्शन केले आहे. तसेच, गणितविश्वम्' या महाविद्यालयीन गणित क्लबचे ते संरक्षक असून, क्लबच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांना राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळाली आहे.

याव्यतिरिक्त त्यांची नुकतीच गोवा विद्यापीठाकडून पीएच. डी. संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे. सन्मान स्वीकारताना डॉ. मोरे म्हणाले, हा पुरस्कार माझा एकट्याचा नाही; माझ्या विद्यार्थ्यांचा, सहकार्यांचा, संस्थेचा आणि कुटुंबाचा आहे. हे यश सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. समाजातील विविध स्तरातून तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी डॉ. विनायक मोरे यांचे अभिनंदन केले आणि त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कोरगाव ग्रामसभेत कचरा, बेकायदेशीर बांधकामाबाबत चर्चा

■ टीम दैनिक हेराल्ड

**कोरगाव, दि. २५ :** कोरगाव ग्रामसभेत आज कोरगाव येथील आज जैवविविधता समिती वर गरमागरम चर्चा होऊन ही समिती बरखास्त करण्याचा ठराव घेण्यात आला.

यावेळी कचरा समस्या बिगर गोमंतकियांनी केलेले बेकायदेशीर बांधकाम आदी विषयावर चर्चा करून ठराव संमत करण्यात आले. अब्दुल करीम नाईक यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्याने सरपंच पदाचा ताबा असलेले दिवाकर जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या ग्रामसभेच्या व्यासपीठावर पंचायत सदस्य समिल भाटलेकर, देवीदास नागवेकर, अब्दुल करिम यासीन नाईक, दिवाकर जाधव, नीता नर्से, कल्पीता कलशावकर, पंच अनुराधा कोरगावकर, लौकिक शेट्ये, पंचायत सचीव श्रध्दा कोरगावकर तर निरीक्षक म्हणून देवानंद गावडे उपस्थित होते.



कोरगाव ग्रामपंचायत क्षेत्रात अनेक ठिकाणी रानात डोंगर डोंगरावर बेकायदेशीर बांध कामे होत आहेत. जंगले नष्ट होत असल्याने पशुपक्षी नैसर्गिक झरे या सर्वांवर विपरीत परिणाम होत आहे असे असताना कोरगाव येथील जैव विविधता समिती त्याकडे लक्ष देत नसल्याने निसर्गाची मोठी हानी होत आहे. हे बेकायदेशीर बांधकाम पंचायतीने त्वरित पाडावे असा ठराव राहुल भगत यांनी मांडलेला ठराव घेण्यात आला . जैव विविधता समिती पर्यावरणाकडे दुर्लक्ष करते यासाठी ही बरखास्त करण्यात यावी अशी वारंवार मागणी केली व यासंबंधी ठराव मांडला. उपसरपंच दिवाकर जाधव व पंचायत सचिव श्रद्धा कोरगावकर यांनी हा ठराव आम्ही संबंधित खात्याकडे पाठवतो असे सांगितले.

माईण वाडा – कोरगाव येथे बेकायदेशीर रित्या सुरू असलेले एका बिगर गोमंतकियाचे बंद पाडण्यात आलेले बांधकाम परत सुरू असून त्याच्या विरोधात पंचायतीने पोलीस तक्रार द्यावी असा ठराव आग्रेल नरोन्हा यांनी मांडला व त्याला जुझे कार्व्हालो यांनी अनुमोदन दिले.माजी सरपंच सुदीप कोरगावकर ,सखाराम कोरगावकर आदीनी यावेळी महत्वपूर्ण सुचना केल्या.

उदय प्रभुदेसाई म्हणाले की, रस्त्या जवळ ओहळात कचरा व प्लास्टिक बाटल्या ओतल्याने नाले तुंबुन लोकांच्या घरादारात पावसाचे पाणी जाते. पंचायतीने लावलेल्या सी सीटीव्ही कॅमेराद्वारे पहाणी करून सार्वजनिक ठिकाणी कचरा ओतणाऱ्यावर कारवाई करावी

भालखाजन येथील स्मशानभूमीच्या छप्पराची दुरुस्ती करण्याची मागणी विकास गावडे यांनी केली. प्रारंभी उप सरपंच दिवाकर जाधव यांनी स्वागत केले. शेवटी पंच कल्पीता कलशावकर यांनी आभार मानले.

# वळवई येथे वळवईकर स्मृती बाल आनंद मेळावा



वळवई : वळवईकर स्मृती बाल आनंद मेळावाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात बोलताना जयंत वळवईकर. सोबत गोविंद तारी, राजेंद्र वळवईकर, सुधीर वळवईकर, विठ्ठल सावंत, नंददीप नाईक व सुरेश नाईक.

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. २५ :** ललितप्रभा नाट्यमंडळतर्फे १०५ वर्षे जुनी आद्य गोमंतकीय नाट्यसंस्था ललितप्रभा वळवईतर्फे तारी सोसायटी आणि श्री गजांतलक्ष्मी संस्थानच्या सहकार्याने आयोजित कै. उमाकांत वळवईकर स्मृती बाल आनंद मेळावा २०२५ चे उद्‌घटन नुकतेच वळवईतील तारी सोसायटी सभागृहात करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर कै. उमाकांत वळवईकर यांचे सुपुत्र तथा प्रसिद्ध गोमंतकीय लेखापाल जयंत वळवईकर आणि बंधू सुधीर वळवईकर तसेच हस्तकला प्रशिक्षक नंददीप नाईक, निवृत्त शिक्षक सुरेश नाईक, ललितप्रभाचे उपाध्यक्ष विठ्ठल सावंत, खजिनदार गोविंद तारी, ललितप्रभा सचिव तथा तारी सोसायटी व गजांतलक्ष्मी संस्थान समितीचे सदस्य राजेंद्र वळवईकर आदी मान्यवर उपस्थित होते.

विठ्ठल सावंत यांनी प्रास्ताविक सादर करताना ललितप्रभेच्या वाटचालीत कै. उमाकांत भाऊंचे योगदान उलगडताना वळवई गावची नाट्यचळवळ जोपासण्यासाठी घेतलेल्या परिश्रमांची माहिती दिली. जयंत वळवईकर यांनी विद्यार्थी जीवनात कलेचे महत्व अधोरेखित करताना अभ्यासू वृत्तीचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

२२ मे ते ०१ जून दरम्यान चालणाऱ्या या मेळाव्यात स्थानिक शिक्षक नंददीप नाईक हे हस्तकला विषय हाताळणार आहेत तर प्रतिथयश युवा रंगकर्मी शेफाली नाईक आणि वैभव कवळेकर हे नाट्यकलेबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद तारी तर राजेंद्र वळवईकर यांनी आभार व्यक्त केले.

IN THE COURT OF INSPECTOR OF SURVEY & LAND RECORDS, PERNEM, GOA

File No. ISLR / DEM / PER / COR / 23 / 25 / 595

1. Mr. Deepak Kohli, R/o. A-341, Second Floor, Near Police Station, Vikas Puri, New Delhi West, Delhi 110018 2. Mr. Arun Malik, R/o. C-9/9351, Vasant Kunj, Delhi 110070 3. Mr. Manik Dawar, R/o. 5/3, First Floor, Near Patel Nagar, East Patel Nagar, Patel Nagar, New Delhi, Central Delhi, Delhi110008 .......Applicant

V/s

1. Mr. Vasant Bhikaji Ganpule & 11 Others ...... Respondents

To, 5. Hari Bhikaji Ganpule 10. Ravindra Shripad kerikar, Both R/o of Bhatwadi, Corgao Village, Pernem Taluka, North Goa, Goa 403512

PUBLIC NOTICE

WHEREAS, the above named applicant have filed an application dated 06/03/2025 before this Court under section 114 of Land Revenue Code 1968, for Demarcation of property surveyed under Survey no. **21/4** of **Corgao** village of **Pernem** Taluka.

AND WHEREAS, the applicant Mr. Deepak Kohli, vide application dated 19/05/2025 submitted that the notices sent through Reg. AD to the respondents No. 5 and 10 are returned back with the endorsement on the envelopes "Addresse cannot be located". The applicant state that they are unaware about present addresses of the unserved respondent / their legal heirs and hence prayed for substitute service of notice by serving notice through publication in the local daily Newspaper.

AND WHEREAS, I am fully satisfied that this is a fit case for such a publication.

Now therefore, the adjoining holder/ interested party in above demarcation case, notice is hereby given that demarcation of above said property is fixed on **05/06/2025 @ 10.30 a.m.** onwards and you are directed to remain present at the site on the above mentioned date, failing which demarcation will be carried out in your absence. The applicant shall remain present at the office of Inspector of Survey and Land Records, Pemem at 9.30 a.m failing which the case will be rejected/dismissed.

Further, notice is given that said matter is scheduled for hearing on **04/07/2025 @ 11:30** a.m. at which date and time you are directed to remain present in the Court of Inspector of Survey and land Records Pernem Goa, to file your say failing which matter will be disposed in your absence.

Given under my hand and seal of this office on this 23rd day of May 2025.

Sd/- **Vinita V. Kambli** Seal

Inspector of Survey & Land Records, Pernem, Goa

# हरमलमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २५ :** येथील पंचायत मंडळातर्फे गावातील गुणवंत दहावी व बारावीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव मांद्रे मतदारसंघाचे आमदार जीत आरोलकर यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला.ह्या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सरपंच अनुपमा हरेश मयेकर होत्या.

या सोहळ्यात दहावी परीक्षेत दीक्षा तांडेल ९३ टक्के, दिशा तांडेल ९१ टक्के, अलीशा पालयेकर ९० टक्के, रोझेन रोड्रिगीस ९०.५० टक्के, सांचीया डिसोझा ९० टक्के राचेल डिसोझा ८३.६७ टक्के गुण तर बारावी कला शाखेत काम्म्या गोस्वामी ९३ टक्के, कार्तिक जाधव ९० टक्के व ऋग्वेद बांधकर ८८ टक्के, कॉमर्स शाखेत प्रथम दृष्टी गावडे ९२ टक्के, मनश्री नाईक ८५ टक्के, माही नाईक, ८१ टक्के गुण, विज्ञान विभाग प्रथम जोनेझ पिंटो ८४ टक्के, मितेश परब ८३.५ टक्के, उत्तम परब ८३ टक्के. व्यावसायिक विभाग प्रथम चिन्मयी कांडोलकर ९६ टक्के, सियेना फर्नांडिस ९४ टक्के व रेयान फर्नांडिस ९१ टक्के गुण यांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे आमदार जीत आरोलकर सोबत सरपंच अनुपमा मयेकर उपसरपंच सोनाली माज्गि,पंच सांतान फर्नांडिस,सुशांत गावडे,भिकाजी नाईक व पंचायत सचिव सुभाष कांबळी उपस्थित होते. पंचायत कर्मचारी तृप्ती शेटकर यांनी मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. चंद्रहास दाभोलकर यांनी निवेदन व आभार मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी गोपाळ खवणेकर, प्रमोद गावडे, अग्णेस रॉड्रिग्ज यांनी सहकार्य केले.



हरमल : गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरवप्रसंगी आमदार जीत आरोलकर. सोबत सरपंच अनुपमा मयेकर, उपसरपंच सोनाली माज्जी, सांतान फर्नांडिस, सुशांत गावडे, भिकाजी नाईक व सुभाष कांबळी.